**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **स्कायरूट या भारतीय अंतराळ स्टार्टअपच्या इन्फिनिटी कॅम्पसचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले दूरस्थ पद्धतीने उद्घाटन.**
2. **अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शेतीशी निगडीत कर्जवसुलीला एक वर्षाची स्थगिती देण्याचा राज्य सरकारचा निर्णय.**
3. **राज्यातील वाळू आणि गौण खनिजांच्या अवैध उत्खनन, वाहतुकीवर अंकुश लावण्यासाठी कठोर कारवाई होणार- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.**
4. **युनेस्कोच्या मुख्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण.**
5. **विदर्भात थंडीचा जोर कमी, ३-४ दिवसात पावसाची शक्यता.**

-------------------------------------

स्कायरूट इन्फिनिटी

भारत आज अवकाश क्षेत्रात एका अभूतपूर्व क्षणाचा साक्षीदार होत आहे. खाजगी क्षेत्र आता भारताच्या अवकाश परिसंस्थेत मोठी झेप घेत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. आज उद्घाटन करण्यात आलेला स्कायरूटचा इन्फिनिटी कॅम्पस हा भारताची नवी विचारसरणी, नवोपक्रम आणि युवा शक्तीचं प्रतिबिंब असल्याचं पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधानांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून भारतीय अंतराळ स्टार्टअप स्कायरूटच्या इन्फिनिटी कॅम्पसचं उद्घाटन आणि स्कायरूटच्या पहिल्या ऑर्बिटल रॉकेट, विक्रम-१ चं आज अनावरण केलं, त्याप्रसंगी ते बोलत होते.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ सेकंद)***

***स्कायरूट का इन्फिनिटी कैंपस भारत की नई सोच, इन्नोवेशन और सबसे बड़ी बात यूथ पावर का प्रतिबिंब है। हमारी युवा शक्ति की इन्नोवेशन, रिस्क टेकिंग ॲबिलिटी और एंटरप्रेन्योरशिप आज नई बुलंदी छू रही हैं आने वाले समय में भारत ग्लोबल सेटेलाइट लॉन्च इकोसिस्टम में एक लीडर बनकर उभरेगा।***

-------------------------------------

## कर्जाच्या वसुलीला स्थगिती

महाराष्ट्रात यंदा जून ते सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पुढच्या एक वर्षासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच सर्व बाधित तालुक्यांच्या सर्व गावातील बाधित शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाचं मध्यम मुदत कर्जात रुपांतरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सहकार विभागाने यासंदर्भातील परिपत्रक जारी केलं आहे. राज्य सरकारने ऑक्टोबर महिन्यात ३२ हजार कोटींचा विशेष मदतनिधी जाहीर केला होता; त्याचवेळी दुष्काळी उपाययोजना, सवलती लागू करण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर कर्ज पुनर्गठन आणि वर्षभरासाठी शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे. राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई त्याचप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसंच सहकार आयुक्तांनी परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल याची दक्षता घ्यावी, असंही परिपत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

------------------------------------

## चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील वाळू आणि गौण खनिजांच्या अवैध उत्खनन आणि वाहतुकीवर अंकुश लावण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अत्यंत कठोर निर्णय घेतला असून, अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांचे परमिट जागेवरच निलंबित किंवा रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या संदर्भातील परिपत्रक आज महसूल विभागाने जारी केले. नवीन निर्देशांनुसार पहिल्या गुन्ह्यात ३० दिवस, दुसऱ्या गुन्ह्यात ६० दिवस तर तिसऱ्या गुन्ह्यात वाहनाचे परमिट कायमस्वरूपी रद्द करून वाहन जप्त केले जाणार आहे. ट्रक, डंपर, जेसीबी, पोकलैंड, ट्रॅक्टर ट्रॉली यांसह सर्व यांत्रिक उपकरणांवर ही कारवाई लागू असेल. महसूलाची हानी, पर्यावरणाचे नुकसान आणि वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन ही कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

------------------------------------

## पैसे सापडणे-बावनकुळे प्रतिक्रिया

निवडणूक काळात भाजप कार्यकर्त्यांच्या घरी पैसे सापडल्याच्या प्रकरणी चौकशी आवश्यक असल्याची प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. निवडणुकीत पैसे वाटप आढळल्यास तत्काळ कारवाई होते, पण पैसे घरात

आढळल्याने त्यामागील व्यवहार तपासणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी थेट स्टिंग करण्याऐवजी पोलिस किंवा निवडणूक आयोगाकडे तक्रार करणे योग्य ठरले असते, असेही बावनकुळे म्हणाले.

-------------------------------------

प्रारूप मतदार यादी

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करणं, तसंच अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध करण्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. यानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत आता २७ नोव्हेंबर ऐवजी ३ डिसेंबर झाली आहे, हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्याची मुदत ५ डिसेंबर ऐवजी १० डिसेंबर, मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करण्याची मुदत ८ डिसेंबर ऐवजी १५ डिसेंबर आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्याची मुदत १२ डिसेंबर ऐवजी २२ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

-------------------------------------

शरद पवार

महायुतीतल्या तिन्ही पक्षांमध्ये निधी देण्यावरून चढाओढ लागली आहे, असा आरोप ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज केला. बारामती इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. हल्ली कामावर मतं मागितली जात नाहीत, तर पैसे देऊन, निधी देऊ अशी आश्वासनं दिली जातात. ही चांगली गोष्ट नाही. अर्थकारण आणून निवडणुका जिंकायच्या, हाच दृष्टिकोन असेल, तर त्यावर भाष्य न केलेलं बरं, असं पवार म्हणाले. राज्य सरकारनं कर्जवसुलीला एका वर्षाची स्थगिती देण्याचा निर्णय तात्पुरता उपयोगी ठरेल, पण शेतकऱ्यांचं झालेलं आर्थिक नुकसान पाहता त्यातली काही रक्कम सरकारनं द्यायला हवी होती, असं मतही पवार यांनी मांडलं.

-------------------------------------

युनेस्को

पॅरिस इथल्या युनेस्कोच्या मुख्यालयात काल संविधान दिनानिमित्तानं डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या त्यांच्या पोस्टमध्ये अभिमान व्यक्त केला आहे. भारतीय राज्यघटना तयार करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला दिलेली ही आदरांजली आहे, असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांच्या विचारांनी आणि संकल्पनांनी अगणित लोकांच्या जीवनात शक्ती आणि आशा निर्माण केल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------------

इफि

गोव्यात सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज उत्कृष्ट चित्रपटांची मेजवानी असून बहुतांश प्रेक्षागृहं हाऊसफुल्ल झाली आहेत. ओरेंडा, कॉटन क्वीन, अ पोएट, स्लीपलेस सिटी, द वूमन या गाजलेल्या चित्रपटांचं आज प्रदर्शन होणार आहे. तर, आजचा मास्टरक्लास विशेष आकर्षण असणार आहे. अभिनेता आमिर खान "सामाजिक परिवर्तन आणि समावेशकतेचे कथात्मक शिल्पकार" या विषयावर मार्गदर्शन करणार आहे. तसंच 'शोले' चित्रपटाला ५० वर्ष झाली, त्यानिमित्त दिग्दर्शक रमेश सिप्पी आणि किरण सिप्पी 'शोले आजही का भावतो?' या विषयावर संवाद सत्राला संबोधित करणार आहेत.

-----------------------------------------

हवामान

गेल्या काही दिवसांपासून विदर्भात थंडीचा जोर कमी झाला असून किमान तापमानात सातत्याने वाढ होते आहे. आज भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक कमी 14 अंश सेल्सिअस इतक किमान तापमान नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ गोंदिया इथं 15. 5 गडचिरोली  इथं 16. 6 इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. नागपूर सह उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 17 ते 19 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. तापमान 33 पूर्णांक सहा अंश सेल्सिअस एक नोंदवण्यात आलं हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार आगामी 30 नोव्हेंबर आणि एक डिसेंबर रोजी चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

-----------------------------------------

प्रत्यक्ष पाहणी

चंद्रपूर जिल्ह्यातील इरई नदीलगतच्या पूरबाधित गावांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी चंद्रपूर पाटबंधारे विभागाचे फिरते पथक १ ते ७ डिसेंबरदरम्यान दौरा करणार आहे. या मोहिमेत कढोली, पायली, नेरी, पडोली, दाताळा यांसह परिसरातील गावांचा समावेश असून, पथक नागरिकांशी संवाद साधून पूरस्थितीबाबत माहिती संकलित करणार आहे. नागरिकांनी वस्तुनिष्ठ माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन विभागाने केले आहे.

-----------------------------------------

कापूस वेचणी

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर आणि दर्यापूर परिसरात पहिल्या कापूस वेचणीत प्रतिएकर तीन ते सहा क्विंटलपर्यंत उत्पादन मिळाले आहे. मात्र वाढलेल्या थंडीमुळे वेचणीचा वेग मंदावण्याची शक्यता आहे. मजुरीचे दर घसरल्याने परराज्यातून आलेल्या शेतमजुरांना रोजगार शोधण्याची वेळ येऊ शकते, अशी चर्चा शेतकऱ्यांत सुरू असल्याचे हिंदुस्तान समाचार या वृत्त संस्थेच्या बातमीत म्हंटले आहे.

-----------------------------------

सांडपाणी शुद्धिकरण संयंत्र

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ आणि नागपूरस्थित नीरी यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या सांडपाणी शुद्धिकरण संयंत्र प्रकल्पाचे उद्घाटन आज झाले. या प्रसंगी नीरीचे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन प्रमुख अतिथी, तर कुलगुरू डॉ. अतुल वैद्य अध्यक्षस्थानी होते. या प्रकल्पातून सांडपाणी प्रक्रिया करून पुनर्वापरासाठी पाणी उपलब्ध होणार असून घनकचऱ्यापासून मलगाळ खतनिर्मिती केली जाणार आहे. भारतातील वाढत्या सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापन समस्यांवर हा प्रकल्प प्रभावी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

-----------------------------------

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

२०२५-२६ मध्ये भारताची अर्थव्यवस्था सहा पूर्णांक ६ टक्के दराने वाढेल असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं व्यक्त केला आहे. अमेरिकेने लावलेल्या 50 टक्के शुल्कांच्या प्रतिकूल परिणामांना वस्तू आणि सेवा करातील सुधारणा कमी करण्यात मदत करतील, असंही आयएमएफनं नमूद केलं आहे.

-----------------------------------

शेअर बाजार

देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळीला स्पर्श केला मात्र त्यानंतर नफेखोरी झाल्यानं दोन्ही निर्देशांक घसरले. सकाळी व्यवहार सुरू झाले तेव्हापासूनच बाजारात तेजी होती. व्यवहाराच्या दरम्यान सेन्सेक्सनं ४४६ अंकांची तेजी नोंदवून ८६ हजार ५६ च्या विक्रमी पातळीला स्पर्श केला होता. निफ्टीनं १०५ अंकांच्या वाढीसह २६ हजार ३१० अंकांची विक्रमी पातळी गाठली होती. त्यानंतर नफा वसुली सुरू झाल्यानं दोन्ही निर्देशांकात घसरण दिसून आली. उच्चांकी पातळीवरुन सेन्सेक्स सुमारे पावणे सहाशे आणि निफ्टी सुमारे दीडशे अंक खाली आला आणि दोन्ही

निर्देशांकात घसरणीसह व्यवहार सुरू होते. सध्या पुन्हा दोन्ही निर्देशांकात थोडीफार घसरण दिसत आहे.

-------------------------------------